औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या सोमवार दि. ३०.१.८९ रोजी झालेल्या ३४ व्या सभेचा कार्यवृत्तांत.

---

सभेस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| श्री. ईश्वर भोसीकर | सभापती, औरंगाबाद मंडळ, |
| श्री. अ. म. महाजन | उपसभापती, औरंगाबाद मंडळ. |
| श्री. गोविंद स्वरूप<br>आयुक्त, औरंगाबाद विभाग | सभासद |
| श्री. द. मो. गोडघाटे<br>उपसंचालक नगररचना, | सभासद |

श्री. शारूरकर कार्यकारी अभियंता हे आयुक्त महानगरपालिका यांचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते.

सभेच्या प्रारंभी जमिन संपादनाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली. चर्चा करतांना मा. सभापती यांनी असे सुचविले की, १० वर्षाच्या प्लॅनमध्ये प्राधिकरणाच्या घरबांधणीसाठी जमिन राखून ठेवण्याबाबत सहाय्यक संचालक नगररचना यांच्या कार्यालयाकडे नियोजीत १० वर्षाचा प्लॅन तयार करतेवेळी खाजगी व शासकीय जमिनीसह आरक्षणाची मागणी करावी.

आयुक्त, औरंगाबाद विभाग यांनी यावर असे सांगितले की, जमिन संपादनानासाठी निवडणे ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे व ती तालुका पातळीपर्यन्त नेली जावी. जमिनी आधीच संपादन न केल्यास नंतर एक तर जमिनी उपलब्ध होणार नाहीत किंवा त्यांची किंमत खूप वाढेल.

तसेच आयुक्त यांनी असे सांगितले की, ज्या ज्या ठिकाणी योग्य सरकारी जमिन आहे तिची मागणी मंडळाने जिल्हाधिका-याकडे करावी. तसेच जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर सर्व शासकीय जमिनीचा शोध घ्यावा असेही आयुक्तांनी सांगितले. ६०:४० या तत्वावरील वाटाघाटीचे किती प्रकरणे आहे त्याची माहिती देण्याविषयी आयुक्तांनी सूचना केली. जेथे जेथे वाटाघाटी करणे शक्य आहे तेथे वाटाघाटी करू व त्यातील तातडीची प्रकरणे आधी घेता येतील असे त्यांनी सांगितले.

गलिच्छवस्ती सुधारणा व गलिच्छवस्ती श्रेणीवाढ योजनेच्या कार्यक्रमासंबंधी प्रगती विषयी टिप्पणी १६ फेब्रुवारी पुर्वी मला मावी म्हणजे जिल्हाधिकारी व न. प. मुख्याधिकारी यांच्या सभेत आढावा घेता येईल अशी सूचना त्यांनी दिली.

आयुक्त यांनी वाळूज विशेष नियोजन प्राधिकरणाच्या कामातील प्रगतीबाबत विचारणा केली. रचनात्मक आराखडा रोजंदारीवर किंवा करारावर माणसे घेऊन करता येईल काय ते पहावे. कारण प्रतिनियुक्तीवरील कर्मचारी अजाप उपलब्ध झालेले नाही असे त्यांनी सुचीत केले. सहाय्यक संचालक नगररचना यांनी ७१३ हे. या रचनात्मक आराखडा करण्याबाबत येणाऱ्या अडचणीची माहिती दिली. पूर्ण क्षेत्राचा ढोबळ रचनात्मक आराखडा [illegible] [स्ट्रक्चर प्लॅन] ६ महिन्यामध्ये करून देणे शक्य होईल असे सांगितले व यामुद्यावर सर्वांचे सहमत झाले. ७१३ हे. चा सविस्तर रचनात्मक आराखडा तयार करावे आणि ११००० हे चा रचनात्मक आराखडा तयार करावा असा निर्णय घेण्यांत आला.

चर्चेनंतर सभेचे कामकाजाला सुरुवात करण्यांत आली.

विषय क्र. १: मंडळाच्या दिनांक २९.१२.८८ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत कायम करणे.

<u>ठराव क्र. १४०</u>

मंडळाच्या दिनांक २९/१२/८८ रोजी झालेल्या सभेच्या कार्यवृत्तांस मान्यता देण्यात आली.

याविषयावर चर्चा करतांना मा. आयुक्त यांना विषय क्र ४ व ठराव क्र. १३७ यात धुळे येथील ३८० अल्प उत्पन्न गट योजनेतील सर्व्हे नं. ४७८ वर बांधलेल्या गाळ्यापैकी कांही गाळ्यांचे दि. २७. ४. ८८ रोजी आलेल्या चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानासंबंधी जिल्हाधिकारी यांच्याकडे मंडळातर्फे पाठविण्यांत आलेल्या प्रस्तावाची उपसभापती यांनी कल्पना दिली. यावेळी मा. आयुक्तांनी असे सांगितले की, मंडळातर्फे प्रस्ताव पाठविणे योग्य नसून त्याऐवजी ज्या ज्या गाळ्यांचे नुकसान झाले त्या त्या गाळेधारकांना वैयक्तीकरित्या अर्ज करावयास लावणे व सदर खर्च मंडळाने केला असल्यामुळे मंडळाकडे रक्कम वळती करण्याविषयी कार्यवाही करावे असे मतप्रदर्शित केले. यावर उपसभापतींनी सांगितले की, याप्रमाणे कार्यवाही करण्यांत येईल.

विषय क्र. २:- देवळाली, नासिक येथील उच्च उत्पन्न गटातील <u>६० गाळ्यांच्या बांधकामाबाबत ठेकेदाराची मागणी.</u>

<u>ठराव क्र. १४१</u>

याविषयावर चर्चा होऊन असे ठरले की, याप्रकरणी विधीसल्लागार यांचा सल्ला घ्यावा व पुढील सभेमध्ये हा विषय ठेवावा असे सर्वानुमते ठरले.

. . . ३

विषय क्र. ३ गाळे वाटपासाठी विलंब झालेल्या धुळे येथील गाळ्यांचे राखण व संरक्षण करण्यासाठी चौकीदाराकरिता खर्चाची रक्कम परत मिळणेबाबत, कंत्राटदाराच्या मागणीबाबत विचार करणे.

ठराव क्र. १४२

याविषयावर चर्चा करतांना उपसंचालक श्री. द. मो. गोडघाटे यांनी असे विचारले की, वॉच ॲण्ड वार्डची रक्कम अदा केल्यास नुकसान झालेले काम करुन घेण्यात येईल काय ? यावर उपसभापती यांनी असे सांगितले की, चोरीमुळे नुकसान झालेले काम ठेकेदाराकडून भरपाई दुरुस्ती करुन घेण्यांत येईल व नंतरच पैसे अदा करण्यांत येतील.

कंत्राटदारास १.४.८८ ते ३०.९.८८ ह्या सहा महिन्याचे वॉच ॲण्ड वार्डचे देय रु. १२,२०० हे अल्प उत्पन्न गटातील [३८० घरापैकी वाटप झालेली घरे सोडून उर्वरीत] घराकरिता व रु. १९,२०० अत्यल्प उत्पन्न गटातील १५८ घराकरिता [वाटप झालेली घरे सोडून] वॉच ॲण्ड वार्डची रक्कम कार्यकारी अभियंता नासिक यांनी सर्व प्रकरण तपासून व घरांचे झालेले नुकसान दुरुस्त करुन दिल्या नंतरच अदा करावी या अटीवर मान्यता देण्यांत आली.

विषय क्र. ४: आर-२९ प्रायोगिक तत्वावरील गाळे मंडळाच्या कर्मचा-यांना देणेबाबत.

ठराव क्र. १४३

याविषयावर चर्चा करुन असा निर्णय घेण्यांत आला की, कर्मचा-यांनी मागणी केल्याप्रमाणे आर-२९ मधील प्रायोगिक तत्वावरील वसाहत यांच्यासाठी उपलब्ध असलेले विविध मध्यम उत्पन्न गटातील आरक्षण एकत्रित करुन २१ पैकी फक्त ११ गाळे त्यांना देणेबाबत विशेष प्रकरण म्हणून प्राधिकरणाकडे मंजूरीस्तव पाठवावे व प्राधिकरणाकडून मंजूरी मिळाल्यासच कर्मचाऱ्यांना गाळे वाटप करण्यांत यावे सदर गाळ्यांचे बांधकाम लाभधारकांनी स्वत: करुन घ्यावयाचे आहे.

विषय क्र. ५:- असाधारण परिस्थितीत केलेल्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करणेबाबत.

ठराव क्र. १४४

याविषयावर चर्चा होऊन असे ठरले की, श्री. एन. व्ही. येरावार उप अभियंता यांनी असाधारण परिस्थितीत त्यांच्या मुलीच्या आजारपणासाठी केलेल्या खर्चाच्या ९०% म्हणजे रु. ८५६/- च्या प्रतीपुर्तीस सदर देयक

-४-

प्राधिकरणाच्या आदेशाच्या आधारे तपासून देण्याच्या अटीवर मंजूरी देण्यांत आली.

तसेच कनिष्ठ अभियंता श्री. आर. बी. लोहार यांनी त्यांच्या मुलाच्या आजारपणासाठी केलेल्या एकुण खर्चाच्या ९०% खर्च म्हणजे रु. २४०३/- च्या प्रतिपूर्तीस प्राधिकरणाचे आदेश व्यवस्थती बघून नंतर अदा करावे याअटीवर मंजूरी देण्यांत आली.

मा. सभापतींच्या परवानगीने आयत्यावेळी आलेला विषय.

विषय:- औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या सातपूर येथील वसाहतीमधील महाराष्ट्र हौसींग कॉलनी सहकारी ग्राहक संस्था [म] यांची व्यापारी तत्वावरील पांच भूखंडाच्या मागणीबाबत.

ठराव क्र. १४५

याविषयावर सर्वंकष चर्चा होऊन असे ठरले की, या भूखंडाकरिता जाहिरात देऊन खुल्या निविदा पध्दतीने भूखंडाचे वाटप करावे.

. .

प/२२२८९